महानगरपालिका निवडणुका
जाहीर प्रचारबंदीच्या कालावधीबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.८/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २० जानेवारी, २०१७.

## आ दे श

ज्याअर्थी; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए मधील तरतुदीनुसार महानगरपालिकांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का.६, दि. १४ ऑक्टोबर, २०१६ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात आदर्श आचारसंहितेबाबत सुधारीत आदेश काढले असून त्यामध्ये महानगरपालिका निवडणुकांमध्ये जाहीर प्रचारबंदीचा कालावधी कोणता राहील याबाबत स्पष्ट उल्लेख नाही.

आणि ज्याअर्थी; जाहीर प्रचारबंदीच्या कालावधीबाबत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २७ अअ मध्ये प्रचाराकरिता मतदान समाप्तीपूर्वीच्या ४८ तासांमध्ये प्रचाराकरिता कोणतीही सभा घेता येणार नाही, अशा आशयाची तरतूद आहे. तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मध्ये यासंदर्भात स्पष्ट तरतूद नाही.

त्याअर्थी; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए (४) व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(४) तसेच

राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर सर्व महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये जाहीर प्रचार बंदीचा कालावधी मतदान समाप्तीच्या अगोदर ४८ तास इतका राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३. सर्व विभागीय आयुक्त
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य.
५. सर्व महानगरपालिका आयुक्त
६. सर्व जिल्हाधिकारी
७. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठामध्ये नेमलेले वकील
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती.